सत्यमेव जयते

# सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रम

## शंका—समाधान



राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, कुटुंब कल्याण भवन, पुणे-४११ ००१.

# प्र स्ता व ना

भारत सरकारने सार्वत्रिक रोगमुक्तीचा भाग म्हणून ( यु. आ. पी. ) सन 1985 पासून या योजनेची सुरुवात आपल्या देशात करण्यात आली. पोलिओ, गोवर, क्षय, डांग्या खोकला, घटसर्प व धनुर्वात या रोगांपासून गरोदर स्त्रिया, अर्भके व बालके यांचे रक्षण करणे हे या सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

जर ही योजना यशस्वी व्हावयाची असेल तर प्रचाराची व्यवस्था होणे, जेणेकरून समाजामध्ये जागृती होऊन लसीकरण सेवेची मागणी होणे आवश्यक वाटेल.

या योजनेच्या अंमलबजावणीत काही प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता गृहीत धरून संभाव्य प्रश्न व त्यांची अधिकृत उत्तरे या पुस्तिकेत दिलेली आहेत. ती आपण सर्वांनी वाचावीत व इतरांना सांगावीत हा या मागील हेतू आहे.

( म. त्र्यं. जोशी )
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण,
माताबाल संगोपन व शालेय आरोग्य,
पुणे - 411 001

**1 : प्रश्न रोगप्रतिबंधक योजना म्हणजे काय?**

सांसर्गिक रोगांपासून लसींद्वारा मानवी शरीराच्या रक्षणाच्या मार्ग म्हणजे रोग प्रतिबंधन होय.

**2 : प्रश्न भारतातील सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमाचे स्वरूप काय आहे?**

सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमाच्या योजनेच्या उद्दिष्टात बालकांना होणारे सहा जीवघेणे रोग आहेत. उदा. गोवर, पोलिओ, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात व बालक्षय यांपासून संरक्षण देणे, याचा समावेश आहे.
गरोदर स्त्रियांचे धर्नुवातापासून संरक्षण करणे याचाही समावेश या योजनेत आहे. त्याचा फायदा त्या गरोदर स्त्रीला तर होतोच; परंतु तिच्या बाळालाही लाभ होतो.

**3 : प्रश्न गरोदर स्त्रियांना कोणत्या प्रकारच्या लसी दिल्या जातात?**

गरोदर स्त्रीला धनुर्वात प्रतिबंधक (टी. टी. ची) लसीची गरोदरपणाच्या पूर्व काळात दोन इंजेक्शने दिली गेली पाहिजेत. या दोन इंजेक्शनांमधील किमान काळ एक महिना तरी असला पाहिजे. तसेच दुसरे इंजेक्शन प्रसूती दिनांकापूर्वी किमान एक महिना आधी दिले गेले पाहिजे.

**4 : प्रश्न गरोदर स्त्रीला प्रत्येक गरोदरपणात धनुर्वाताची ही दोन्ही इंजेक्शने देणे आवश्यक आहे का?**

नाही. जर गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत त्या गरोदर स्त्रीने धनुर्वाताची दोन्ही इंजेक्शने घेतली असतील तर चालू गरोदरपणात धनुर्वाताचे एक 'बूस्टर' इंजेक्शन घेणे पुरेसे आहे.

**5 : प्रश्न गरोदर स्त्रीला धनुर्वात रोगप्रतिबंधक लस टोचून घेण्यासाठी गरोदरपणात नाव नोंदवण्यात जर उशीर झाला असेल तरीही तिने धनुर्वाताची इंजेक्शने घ्यावीत का?**

होय. आई व नवजात अर्भक यांचे धनुर्वातापासून संरक्षण होण्यासाठी हे इंजेक्शन घेणे आवश्यक आहे. परंतु धनुर्वातापासून पूर्ण संरक्षण

मिळण्याच्या दृष्टीने बाळंतपणाच्या अपेक्षित तारखेपूर्वी किमान एक महिना अगोदर धनुर्वात प्रतिबंधक दुसरे अथवा बूस्टर इंजेक्शन घेणे आवश्यक आहे.

**6 : प्रश्न अर्भकाच्या बाबतीत रोगप्रतिबंधक लस टोचण्याची सुरुवात केव्हा होते ?**

राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकानुसार अर्भकाला जन्मत:च क्षय-रोगप्रतिबंधक ( बी. सी. जी. ) लस द्यावी अथवा दीड महिना वय झाल्यावर त्याला पोलिओ व त्रिगुणी लसींच्या पहिल्या डोसबरोबर ते द्यावे. त्यानंतर एक महिना झाल्यावर पोलिओ व त्रिगुणीचा दुसरा डोस द्यावा. त्यानंतर आणखी एक महिन्याने पोलिओ व त्रिगुणीचा तिसरा डोस द्यावा. शेवटी बालक नऊ महिन्यांचे झाल्यावर व वर्ष पूर्ण होण्याच्या आत गोवर लस द्यावी.

**7 : प्रश्न माझ्या शेजारच्या बालकाला प्रसूतिगृहातून घरी पाठविण्यापूर्वी एक प्रकारची लस टोचली होती. ती लस कसली होती ?**

ती क्षय प्रतिबंधक ( बी. सी. जी. ) लस होती. बहुतेक सर्व प्रसूतिगृहात व खाजगी दवाखान्यात अर्भकाला जन्मत:च अथवा घरी जाण्यापूर्वी क्षय प्रतिबंधक इंजेक्शन दिले जाते.

**8 : प्रश्न आपण म्हणालात की, बाळाचे वय दीड महिन्याचे असताना रोगप्रतिबंधक लसी टोचण्यास सुरुवात करावी. पण समजा बाळाला उशिराने आरोग्य केंद्रात आणले असेल तर काय करावे ?**

जरी बाळाला रोगप्रतिबंधक लसी द्यायला उशिरा आणले असले तरीही त्याला सर्व प्रकारच्या लसी देणे आवश्यक आहे. दीड महिन्याचे बाळ असताना लसी देणे आदर्श असले तरीही उशीर झालेल्या बाळाला सर्व प्रकारच्या लसी वेळापत्रकाप्रमाणे पात्र असतील त्या द्याव्यात. नाकारू नयेत. थोडक्यात बाळाचे वय एक वर्षाचे होण्यापूर्वी सर्व लसी दिल्या जाण्याचे प्रयत्न आवर्जून करावेत.

**9 : प्रश्न बाळाला बरे नसताना सुद्धा रोगप्रतिबंधक लसी द्याव्यात काय ?**

होय. सर्दी, पडसे, खोकला, हगवण या सारखे किरकोळ आजार व कुपोषण हे रोगप्रतिबंधक लसी टोचण्यात बाधा आणीत नाहीत. कुपोषण अवस्थेतील मुलास तर रोगप्रतिबंधक लस त्वरित देणे आवश्यक आहे. कारण कुपोषित बाळ रोगास सहजपणे बळी पडते.

**10 : प्रश्न बाळाला हगवण झाली असताना तोंडावाटे दिलेली पोलिओ लस परिणामकारक ठरते काय ?**

हगवण झालेल्या अवस्थेतसुद्धा पोलिओ लस दिल्यास पूर्णपणे परिणामकारक जरी ठरली नाही तरी काही प्रमाणात तरी त्याचा पोलिओ प्रतिबंध होण्यास मदत होते. बाळाची हगवण बरी होताच मात्र पोलिओ लसीचा दुसरा डोस रोगप्रतिकार शक्ती वाढवण्याच्या दृष्टीने शक्यतो लवकर द्यावा.

**11 : प्रश्न माझ्या एका नातेवाईकाचे बाळ दहा महिन्यांचे असून त्याला अद्याप कोणतीही लस दिलेली नाही. जर आता त्याला प्राथमिक आरोग्य केंद्रावर नेले तर कोणत्या लसी दिल्या जातील ?**

बाळाचे वय नऊ महिन्यांपेक्षा जास्त असल्याने त्याला सर्व प्रकारच्या लसी एकाच वेळी देण्यास सुरुवात करण्यास हरकत नाही. म्हणजेच तुमच्या या नातेवाईकाच्या बाळाला पहिल्या खेपेतच क्षय-रोगप्रतिबंधक, त्रिगुणी, पोलिओ व गोवर या लसी द्याव्यात. त्यानंतर एक महिन्याने पोलिओ व त्रिगुणीचा प्रत्येकी दुसरा डोस द्यावा. त्यानंतर एक महिन्याने पोलिओ व त्रिगुणीचा प्रत्येकी तिसरा डोस द्यावा.

**12 : प्रश्न** **माझ्या मित्राच्या बाळाला दोन महिन्यांपूर्वी क्षय प्रतिबंधक इंजेक्शन दिले होते त्या जागेच्या आसपास फोड आले आहेत. असे फोड येणे यात काही काळजी करण्यासारखे आहे काय ?**

आपण आपल्या मित्राला खात्रीपूर्वक सांगा की, यात काळजी करण्यासारखे काही नाही. क्षय-रोगप्रतिबंधक इंजेक्शन दिल्यावर अशा प्रकारची प्रतिक्रिया येणे हे स्वाभाविक आहे. क्षय-रोगप्रतिबंधक इंजेक्शन दिल्यावर साधारणपणे चार ते सहा आठवड्याने असे फोड येणे आणि ते फुटणे व त्यातून पांढरासा द्रव बाहेर येणे हे स्वाभाविक आहे. साधारणपणे इंजेक्शन दिल्यापासून दहा ते बारा आठवड्याने या जखमा भरून येतात आणि त्या ठिकाणी खूण राहते.

**13 : प्रश्न** **मला आठवत नाही की, आमच्या घरातील एका बाळाला त्रिगुणीचे इंजेक्शन दिल्यानंतर एक गळू झाले. बाळ बरेच आजारी पडले. डॉक्टरांना बोलवावे लागले. मगच ती जखम बरी झाली. हे असे का घडले ?**

त्रिगुणी इंजेक्शन दिल्यावर गळू होणे अशी घटना क्वचित प्रसंगी घडते. जर इंजेक्शनची सुई व पिचकारी पूर्णपणे निर्जंतुक न करता लस टोचण्यासाठी वापरली तर असे घडू शकते. लसी टोचण्यात येणारी सुई व पिचकारी निर्जंतुक केलेलीच असली पाहिजे. प्रत्येक इंजेक्शनसाठी वेगळी सुई व वेगळी पिचकारी वापरली गेली पाहिजे. तसा आग्रह धरावा.

**14 : प्रश्न** **रोगप्रतिबंधक लस टोचल्यामुळे अन्य कोणते दुष्परिणाम होतात ?**

अगदी काही थोड्याच बालकांबाबतीत रोगप्रतिबंधक लस टोचल्यानंतर दुष्परिणाम झाल्याचे आढळते. क्षय प्रतिबंधक लस टोचल्यावर फोड येणे. त्रिगुणी लस टोचल्यानंतर इंजेक्शनची जागा हुळहुळी होणे, दुखणे व काही वेळा ताप येणे यांची शक्यता असते. अशा वेळी त्या बाळाला पॅरासिटॅमॉलची अर्धी गोळी किंवा अर्ध्या गोळीची पावडर करून द्यावी. गोवराची लस दिल्यावर अंगावर गोवरा सारखे पुरळ येण्याची शक्यता असते. ते स्वाभाविक आहे.

**15 : प्रश्न** **पुष्कळ बाळांच्या किंवा लहान मुलांच्या बाबतीत त्यांच्या वाढत्या वयाचा भाग म्हणून सर्वसाधारण ताप किंवा पुरळ येणे अशा गोष्टी घडत असतात. जर एखाद्या बाळाला किंवा लहान मुलाला ताप असताना किंवा अंगावर पुरळ आली असताना गोवराची लस द्यावी का ?**

होय. अशाही अवस्थेत गोवराची लस टोचावीच. कारण सर्व प्रकारचे ताप व पुरळ म्हणजे गोवर नव्हे. गोवराच्या संसर्गापासून बाळाचा बचाव व्हावा म्हणून बाळाला यापूर्वी जरी पुरळासह ताप येऊन गेलेला असला तरीही गोवराची लस टोचावी.

**16 : प्रश्न** **बाळाला गोवर प्रतिबंधक लस टोचून घेतलीच पाहिजे असा आपला आग्रह का ? लहान बाळांना गोवर येणे व त्यातून तो बरा होणे ही गोष्ट स्वाभाविकच आहे असे नाही का ?**

आपले म्हणणे बरोबर आहे. जर बाळाला गोवराची लस टोचली नाही तर प्रत्येक बाळाला गोवर येत असतो. परंतु म्हणून या रोगाकडे दुर्लक्ष करता कामा नये. जरी बाळ तापातून बरे झाले व अंगावर आलेले पुरळ नाहीसे झाले तरी त्या पुरळाचे दुष्परिणाम दोन-तीन महिन्यांनी जाणवण्याची शक्यता असते.

गोवर आल्यानंतर मुलाला फुफ्फुसाचे ब्रॉंकायटीस किंवा न्यूमोनिया, हगवण हे रोग होऊ शकतात किंवा अंधत्व येऊ शकते. काही बाबतीत गोवरामुळे मेंदूला इजा पोहोचण्याची शक्यता असते. कुपोषित मुलांच्या बाबतीत वरील रोग गंभीर स्वरूपात होण्याची शक्यता अधिक असते, म्हणून गोवर प्रतिबंधक लस टोचणे अत्यावश्यक आहे.

**17 : प्रश्न** **बाळाचे वय जर 15 महिन्यांपेक्षा अधिक झाले असेल व त्यास अजूनपर्यंत कोणतीही लस टोचली नसेल तर आता ती टोचता येईल का ?**

होय. एकूण परिस्थितीचा सारासार विचार करून बाळाला सर्व प्रकारच्या लसी टोचाव्यात. बाळाच्या आईला मात्र यापुढे तरी पुढच्या बाळाला वेळच्या वेळी लसी टोचण्याचे आवाहन करावे.

**18 : प्रश्न** **आम्ही असे ऐकले आहे की, पोलिओ प्रतिबंधक लसीचा डोस बाळाला दिल्यानंतर त्यास स्तनपान देऊ नये. हे कितपत खरे आहे ?**

हे खरे नाही. पोलिओ प्रतिबंधक लसीचा डोस दिल्यानंतर बाळाला निश्चितपणे स्तनपान करू द्यावे. वास्तविक पाहता बाळासाठी स्तनपानाइतका दुसरा कोणताच सकस आहार नाही, त्यामुळे त्याला सर्व काळ स्तनपान करू द्यावे.

**19 : प्रश्न** **काही वेळेला बाळाला दुसऱ्या किंवा तिसऱ्या रोगप्रतिबंधक लसी टोचण्यासाठी नेमक्या एक महिन्याच्या अवधीनंतर नेणे शक्य नसते. अशा परिस्थितीत बाळाला पुन्हा सर्व प्रकारच्या रोगप्रतिबंधक लसी टोचण्याची आवश्यकता आहे काय ?**

नाही. थोडासा फरक झाला तरी चालतो. रोगप्रतिबंधक लसी टोचण्याचा क्रम चालूच ठेवावा व शक्य तेवढ्या लवकर हे काम पूर्ण होईल असे पाहावे. गोवराचे इंजेक्शन, पोलिओचे तीन डोसेस, त्रिगुणीची तीन इंजेक्शने आणि क्षय-रोगप्रतिबंधक एक इंजेक्शन इतक्या लसी दिल्यावरच बाळाचे या सहाही रोगांपासून पूर्णपणे संरक्षण होऊ शकते. यासाठी बाळाला सर्व रोगांच्या रोगप्रतिबंधक लसी वेळच्या वेळी देणे महत्त्वाचे आहे.

**20 : प्रश्न** **रोगप्रतिबंधक लसी टोचण्याच्या उपक्रमात मी कोणत्या प्रकारे मदत करू शकतो ?**

सार्वजनिक लसीकरण कार्यक्रमात आपल्या प्रत्येकाला काम करण्यास वाव आहे. आपण खालील प्रकारे काम करू शकता.

अ) लहान बाळांना रोगप्रतिबंधक लसी टोचण्याचे महत्त्व आपण प्रत्येकाला सांगू शकता.

ब) गोवराच्या संसर्गामुळे होणाऱ्या भयंकर रोगांबाबत / दुष्परिणामांबाबत आपणास भेटणाऱ्या प्रत्येकाशी बोला व गोवर लस टोचण्याचे महत्त्व विषद करा.

क) प्रत्येक गरोदर स्त्रीला गरोदरपणाच्या सुरुवातीला धनुर्वात प्रतिबंधक लस टोचून घेण्याचा सल्ला द्या.

**21 : प्रश्न** **क्षेत्रीय पातळीवर आपल्या कार्यक्षेत्रात लसीकरणाची सुरुवात करायला मुलाचे आदर्श असे योग्य वय कोणते ?**

मुलाला जन्मतःच क्षय प्रतिबंधक व पोलिओची लस दिली तरी चालते. तरी सुद्धा सहा आठवडे वयाच्या बाळाला क्षय-रोगप्रतिबंधक, पोलिओ लसीचा पहिला डोस व त्रिगुणी लसीचा पहिला डोस देणे उत्तम.

**22 : प्रश्न** **आरोग्य कर्मचारी म्हणून काम करीत असताना नऊ महिने वयाचे मूल लसी-करणासाठी आले तर पहिल्याच भेटीत मी कोणत्या लसी द्याव्यात ?**

अशावेळी आपण त्याला क्षय-रोगप्रतिबंधक लस, त्रिगुणी लसीचा पहिला डोस, पोलिओ लसीचा पहिला डोस व गोवराची लस एकाच वेळी देणे आवश्यक आहे.

**23 : प्रश्न** **गोवर प्रतिबंधक लस टोचल्यानंतर दुसऱ्या आठवड्यात साधारणपणे 20% मुलांच्या अंगावर गोवरासारखी पुरळ आल्याचे आढळले आहे. त्याचा लसीकरण न झालेल्या मुलांवर संपर्कामुळे परिणाम होतो काय ?**

नाही. मिनि-मीझलचा संपर्कातून प्रसार होत नाही. म्हणून त्याची इतर लसीकरण न झालेल्या मुलांना बाधा होणार नाही.

**24 : प्रश्न** **एखाद्या मुलाला नजीकच्या पूर्व काळात गोवर येऊन गेला आहे असे त्याच्या मातेने सांगितले तर मी गोवर लसीकरण करू नये काय ?**

व्हायरल इंफेक्शनमुळे गोवराच्या पुरळासारखीच दिसणारी पुरळ येते. त्यामुळे केवळ माताच नव्हे तर काही वेळा डॉक्टरही फसतात. त्यामुळे या मातेच्या सांगण्याच्या भरवश्यावर आपण गोवर प्रतिबंधक लस दिली नाही तर ते बालक गोवर रोगाचे बळी ठरण्याची शक्यता आहे. त्यातून कुपोषण आणि इतर गोवरानंतरच्या गुंतागुंती यांना मार्ग सुलभ होईल. म्हणून गोवर येऊन गेलेल्या मुलाला गोवर प्रतिबंधक लस टोचली तर काही नुकसान नक्कीच होणार नाही. त्यामुळे नऊ महिने पूर्ण झालेले बालक असेल तर गोवर लस निश्चितपणे द्यावी.

**25 : प्रश्न माझ्या क्षेत्रातील सर्व मुलांचे लसीकरण झाले आहे किंवा नाही याची खात्री करून घेण्यासाठी मी काय करावे ?**

लसीकरणाची स्थिती ही सर्वसाधारणपणे कायम वास्तव्याशी निगडीत आहे. म्हणून आपण आपल्या क्षेत्रात जन्मलेली व बाहेर जन्म होऊन आपल्या क्षेत्रात वास्तव्यास आलेली अशा सर्व अर्भकांचा आपण बारकाईने शोध घेऊन यादी करावी व त्यांचे संपूर्ण लसीकरण होईपर्यंत दक्ष राहावे. अशा रीतीने आपण आपल्या क्षेत्रातील सर्व बालकांचे पूर्ण लसीकरण करू शकाल.

**26 : प्रश्न दोन-तीन दिवस खोलीत उघड्यावर पडलेली पोलिओ लस नंतर रेफ्रिजरेटर/व्हॅक्सिन कॅरियरमध्ये ठेवून थंड करून मी वापरू शकतो काय ?**

कदापि नाही. जर पोलिओ प्रतिबंधक लस 37 अंश सें. तपमानात दोन-तीन दिवस अथवा त्यापेक्षा अधिक काळ राहिली तर तिची 50% क्षमता नष्ट होते. त्यामुळे अशी क्षमता वाया गेलेली लस पुन्हा थंड करून त्यात क्षमता आणता येत नाही. अकार्यक्षम झालेली लस काहीही केले तरी परत कार्यक्षम करता येत नाही.

**27 : प्रश्न धनुर्वात प्रतिबंधक लस व द्विगुणी लस रूम टेंपरेचरला ठेवली तरी चालते असे मला सांगण्यात आले आहे. हे खरे आहे काय ?**

जरी या दोन्ही लसी 37 अंश सें. तपमानात चार ते सहा आठवडे ठेवल्या तरी सक्षम राहू शकतात. तरीसुध्दा राष्ट्रीय कार्यक्रमाखाली कोणतीही लस शीत साखळी बाहेर ठेवू नयेत अशा सूचना आहेत. त्यांचे पालन काटेकोरपणे करावे.

**28 : प्रश्न** **आमच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात आठवड्यातून दोन लसीकरण सत्रे आयोजित केली जातात. त्रिगुणी व पोलिओ लसीकरणासाठी पुरेशी मुले येत असल्याने या लसी वाया जाण्याचे प्रमाण अल्प आहे. परंतु क्षय प्रतिबंधक लस व गोवर लसींसाठी 3-4 मुले असतात अशा वेळी आम्ही प्रत्येक सत्रात लसी द्याव्यात का पुरेशी मुले गोळा झाल्यावरच क्षय प्रतिबंधक व गोवर लसी द्याव्यात म्हणजे या लसी वाया जाणे टाळता येईल ?**

नाही. पूर्वनियोजित केलेल्या सत्रांच्या दिवशीच सर्व उपलब्ध मुलांना लसी द्याव्यात. नाहीतर एकूण लसीकरण पातळीवर त्याचा अनिष्ट परिणाम होईल व त्या लसींचे काम कमी होईल. लसीकरणासाठी आलेल्या एका मुलासाठीसुद्धा लसकुपी उघडा, कोणालाही लसीकरणाविना परत पाठवू नका. शिल्लक राहिलेली लस वाया गेली तरी चालेल.

**29 : प्रश्न** **अर्भकांना शक्यतो लहानपणीच लवकरात लवकर लसी का द्याव्यात ?**

एखादे मूल त्याच्या आयुष्याच्या सुरुवातीस रोगाची शिकार होऊ नये व त्या पासून त्याचा बचाव करणे हा लसीकरणाचा उद्देश आहे. सुरुवातीलाच आजाराला बळी पडणे म्हणजे पंगुत्व येणे किंवा प्राणाला मुकणे. म्हणून बहुतेक लसी या बालकाला लहानपणी लवकरात लवकर द्याव्यात.

**30 : प्रश्न** **जन्मतःच क्षय-रोगप्रतिबंधक लस टोचली तर क्षय-रोगप्रतिकार शक्ती निर्माण होत नाही. हे खरे आहे काय ?**

नाही. हे खरे नाही. आता असे सिध्द झाले आहे की, सेल मेडिएटेड इम्युन रिस्पांस (सी.एम.आय.आर.) जन्मतःच आणि तीन महिने वयात पुरेशा प्रमाणात कार्यरत करता येतो. म्हणून नवजात अर्भके जन्मतःच सी. एम. आय. आर. कार्यप्रवृत्त करतात आणि त्यासाठीच आरोग्य संस्थेत जन्माला येणाऱ्या अर्भकांना जन्मतःच क्षय-रोगप्रतिबंधक लस टोचणे ही पद्धत चालू ठेवावी.

**31 : प्रश्न जर एखाद्या बालकाला चुकून पोलिओ लसीच्या दोन थेंबांऐवजी जास्त थेंब पाजले गेले तर कोणत्या विपरित प्रतिक्रिया येणे संभवते ?**

चुकून पोलिओ लसीचे दोनपेक्षा जास्त थेंब पाजले गेले तर त्यात धोका नाही; परंतु प्रत्येकाने काळजीपूर्वक विहित डोस पाजण्यावर कटाक्ष ठेवावा.

**32 : प्रश्न काही शहरी भागात अर्भकांना पोलिओच्या लसीचा एक डोस जन्मत:च देतात; परंतु तो पहिला डोस म्हणून गणला जात नाही. कारण काय ?**

आरोग्य संस्थेत जन्मणाऱ्या अर्भकाला जन्मत:च एक पोलिओ लसीचा डोस देण्याची सुरुवात अगदी अलिकडेच (विशेषत: शहरी भागात) आपल्या देशात केलेली आहे. त्याला 'O' डोस म्हणतात. राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकानुसार तीन डोसचे वेळापत्रक संपूर्ण देशात अंमलात येत आहे. ते तंतोतंत पाळणे आवश्यक आहे. ते तीन डोस बालकाला त्याच्या, 6, 10, 14 आठवडे वयात दिले जातात; त्याशिवाय हा जादा 'O' डोस देण्यात येतो.

**33 : प्रश्न गोवराची लस व त्रिगुणी लस हिवाळ्यात देऊ नये हे खरे आहे का ?**

नाही. हे खरे नाही. सर्व लसी वर्षभरातील कोणत्याही ऋतूत देण्यास हरकत नाही; तसेच त्या तितक्याच परिणामकारक ठरू शकतात.
जर एखाद्या विशिष्ट भागात पोलिओची साथ सुरू असेल, तर त्या काळात केवळ लसी टोचणेच नव्हे तर इतर सर्व प्रकारची इंजेक्शन्स देणे सुध्दा टाळण्याचा सल्ला दिला जातो. अर्थात हे सर्व केवळ पोलिओ साथीच्या काळापुरते मर्यादित आहे.

**34 : प्रश्न** **जर एखाद्या लसीकरण सत्राला केवळ 2-3 मुलेच उपस्थित असतील, तर क्षय-रोगप्रतिबंधक व गोवर लसींचे तयार केलेले उरलेले मिश्रण जवळच्या एखाद्या गावी / वॉर्डात नेऊन / पाठवून वापरता येईल काय ?**

नाही. क्षय-रोगप्रतिबंधक व गोवराच्या लसीत द्रावण घालून तयार केलेले मिश्रण जास्त काळ टिकत नाही. तयार केल्यापासून गोवर लस फक्त तीन तास व क्षय-रोगप्रतिबंधक लस पाच तास टिकते. त्यांनतर त्याची क्षमता लयास जाते. याशिवाय वाहतुकीत तयार केलेली लस दूषित होण्याचा धोका असतो. त्यामुळे एका ठिकाणी तयार केलेली कोणतीही लस दुसरीकडे नेऊ अथवा पाठवू नये.

**35 : प्रश्न** **कव्हरेज इव्हॅल्युएशन सर्व्हे करीत असताना जर एकापेक्षा जास्त पात्र बालके (12 ते 23 महिने) एखाद्या कुटुंबात आढळली तर सर्व मुलांचा त्या सर्व्हेत अंतर्भाव करावा का ?**

होय. 12 ते 23 महिने वयोगटातील रँडम पध्दतीने निवडलेल्या पहिल्या कुटुंबापासून सर्व मुलांचा अंतर्भाव यात करावयाचा आहे. त्यांची लसीकरण स्थिती घ्यावयाची आहे. अशी प्रत्येक क्लस्टरमध्ये एकूण 7 मुले मिळेपर्यंत सलग शोध घ्यावयाचा असतो. जर एखाद्या क्लस्टरमध्ये शेवटच्या कुटुंबात एकापेक्षा अधिक पात्र मुले आढळली, तर ती सर्व घ्यावयाची आहे. मग ती 7 पेक्षा जास्त झाली तरी चालतील.

**36 : प्रश्न** **एखाद्या मुलाला कांजण्या आलेल्या असल्या तरी क्षय-रोगप्रतिबंधक लस टोचता येईल काय ?**

क्षय-रोगप्रतिबंधक लस जन्मतः किंवा लवकरात लवकर देतात; परंतु एक वर्ष वय होण्यापूर्वी निश्चितपणे द्यावी. अगदी सुरुवातीच्या आयुष्यात अर्भकाला कांजण्या होणे अगदीच असंभवनीय आहे. आणि जर एखाद्या बाळाला कांजण्या आल्या असतीलच तर क्षय-रोगप्रतिबंधक लस टोचणे एक महिनाभर पुढे ढकलावे.

**37 : प्रश्न पोलिओची साथ सुरू असताना काय काय कार्यवाही करणे अगत्याचे आहे ?**

पोलिओची साथ सुरू असताना काही खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे.

1) लागण झालेल्या सर्व मुलांची यादी तयार करावी आणि रोग निदानाबद्दल खात्री करून घ्यावी.

2) त्या परिसरातील लसीकरण न झालेल्या मुलांची यादी तयार करून त्यांना पोलिओ लसीचा डोस पाजावा.

3) त्या परिसरातील 0-5 वर्षे वयोगटातील सर्वच मुलांना सर्रास (त्यांची लसीकरण स्थिती न पाहता) पोलिओचा एक जादा डोस पाजावा.

4) पोलिओ साथीच्या काळात कोणतेही इंजेक्शन (त्रिगुणी, अँटिबायॉटिक्स इ.) देण्यात येऊ नये याची खबरदारी घ्यावी.

5) लागण झालेल्या मुलांचे अन्वेषण (इंव्हेस्टीगेशन) करावे व त्यांच्या पुनर्वसनाची व्यवस्था करावी. (योजना आखावी)

**38 : प्रश्न गोवराची लस टोचण्यापूर्वी इंजेक्शन देण्याची जागा (साइट) निर्जंतुक करण्यासाठी स्पिरिटचा उपयोग करावा का ?**

नाही. कारण स्पिरिट हे गोवर लसीच्या क्षमतेवर अनिष्ट परिणाम करते; म्हणून ते तसे वापरू नये. इंजेक्शन देण्याची जागा गरम पाण्यात बुडविलेल्या कापसाच्या बोळ्याने स्वच्छ करणे हे पुरेसे आहे.

**39 : प्रश्न क्षय-रोगप्रतिबंधक लसीच्या द्रावणाच्या काही अँप्युलवर 2.5 मिलि नॉर्मल सलाइन लिहिलेले असते; तर द्रावण तयार करायला मी ते संपूर्ण क्षय-रोगप्रतिबंधक लसीच्या अँप्युलमध्ये घालावे का ?**

नाही. केवळ 2.00 मिलि द्रावण त्यात टाकावे. त्यामुळे क्षय-रोगप्रतिबंधक लसीच्या प्रत्येक विहित डोसमध्ये आवश्यक तेवढीच बॅक्टेरियाची संख्या येते.

**40 : प्रश्न** **जर मला लसीकरण सत्र उरकून परत मुख्यालयी यावयास उशीर झाला व तोपर्यंत रेफ्रिजरेटर असलेले केंद्र बंद झालेले असेल आणि माझ्याकडे न उघडलेल्या त्रिगुणी व पोलिओ लसीच्या कुप्या (व्हॉयल्स) आहेत. अशावेळी मी त्या लस कुप्या दुसऱ्या दिवशी केंद्र उघडल्यावर रेफ्रिजरेटरमध्ये ठेवल्या तर चालेल काय ?**

कदापि नाही. अशावेळी केंद्र उघडण्याची व्यवस्था करावी व परत आलेल्या व न उघडलेल्या लस कुप्या त्याच दिवशी प्रथम रेफ्रिजरेटरमध्ये ठेवाव्यात.

**41 : प्रश्न** **ज्याला इपिलेप्टिक कन्व्हल्शन्सचा पूर्व इतिहास आहे, अशा सहा महिने वयाच्या मुलाला डांग्या खोकल्या (पर्टूसिस) वरील त्रिगुणी लस द्यावी का ?**

नाही. ज्या मुलाला इपिलेप्टीक कन्व्हल्शन्स येण्याचा पूर्व इतिहास आहे अथवा ज्यांच्या पालकामध्ये असा पूर्व इतिहास आहे, त्या बालकाला त्रिगुणी लस टोचू नये. पोलिओच्या लसीबरोबर केवळ द्विगुणी (डी.टी.) लस टोचावी.

**42 : प्रश्न** **सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे यांना सार्वत्रिक लस कार्यक्रमाखाली वाफेवर निर्जंतुकीकरण करणारे ऑटोक्लेव्ह दिलेले आहेत. त्या प्रेशर कुकरमध्ये दोन रॅक्स आहेतच. त्यांचा उपयोग पिचकाऱ्या (सिरिंजेस) व सुया (नीडल्स) लोंबत्या ठेवण्यासाठी आहे. त्यातील रॅकमधील भोकात फक्त दोन मिलिच्या प्लॅस्टिकच्या पुन्हा वापरता येणाऱ्या पिचकाऱ्याच बसतात. त्या सार्वत्रिक लस कार्यक्रमाखाली पुरविलेल्या आहेत; परंतु काचेच्या 2 मिलि पिचकाऱ्या त्यात फिट बसत नाहीत अशावेळी काय करावे ?**

दोन मिलि काचेच्या पिचकाऱ्या ऑटोक्लेव्हमध्ये खालीलप्रमाणे निर्जंतुक करून घ्याव्यात.

- एका रॅकमध्ये सर्व सिरिंजेसचे पिस्टन आणि 5 मिलि / 1 मिलि बॅरल्स भरावेत. ही पहिली रॅक पॅनमध्ये ठेवावी. रॅकवर कव्हर बसवू नका. दुसरी रॅक उलटी करून त्यावर अशी ठेवा की, त्यांच्या पृष्ठभागावरील भोके एकमेकावर येतील.
- 2 मिलि काचेच्या पिचकाऱ्या व बॅरल्स दुसऱ्या रॅकमध्ये पातळ विरविरीत कपड्यात नीटपणे गुंडाळून ठेवाव्यात.
- कुकरचे झाकण लावा व नेहमीप्रमाणे निर्जंतुकीकरण करा.

**43 : प्रश्न** **'प्रव्होकेटिव्ह पॅरालिटिक पोलिओमायलिटिस' होऊ नये यासाठी पोलिओ रोगाच्या साथीच्या काळात कोणतेही इंजेक्शन देण्याचे टाळावे असा सल्ला दिला जातो. असे किती काळ करावे ? कारण त्रिगुणी व गोवर या लसीकरणाचे काम या काळात थंडावेल.**

पोलिओ रोगाच्या साथीच्या काळात त्या भागात वाइल्ड पोलिओ व्हायरसचा प्रसार फार झपाट्याने होतो. त्यामुळे संपर्कातील बालकांना त्वरित संसर्ग होतो. त्यामुळे कोणत्याही इंजेक्शनमुळे बाधा होण्यास मदत होऊन पोलिओचा प्रसार वाढतो. म्हणून शेवटची लागण आढळल्यापासून किमान 35 दिवस तरी इंजेक्शने देणे टाळावे हे उत्तम.

**44 : प्रश्न** **घटसर्प व डांग्या खोकला यांची वेगळी वेगळी लस उपलब्ध आहे का ?**

होय. त्या उपलब्ध आहेत; परंतु इंजेक्शनांची संख्या कमी करण्यासाठी व सोईसाठी घटसर्प - डांग्या खोकला व धनुर्वात प्रतिबंधक लसी एकत्रित करून दिल्या जातात.

**45 : प्रश्न** **स्त्रीच्या गरोदरपणात धनुर्वात प्रतिबंधक लसीचे 4 थे व 5 वे डोस दिले तर त्या मातेचे व तिच्या बाळाचे पुढील दहा वर्षे धनुर्वातापासून संरक्षण होते का ?**

नाही. गरोदरपणी स्त्रीला दिलेल्या धनुर्वात प्रतिबंधक लसीचा (मग ते 4 था वा 5 वा डोस दिलेले का असेनात) उपयोग तिच्या बाळाला केवळ 4-8 आठवडेच (निओनॅटल पिरियड) होतो. म्हणूनच नवजात बाळाला त्रिगुणी लस द्यायला 6 आठवड्यांनी सुरुवात केली जाते.

**46 : प्रश्न** **आम्ही एकाडएक शनिवारी क्षय-रोगप्रतिबंधक / गोवर लसी टोचतो. जर लसीकरणासाठी आलेले मूल 9 महिने अथवा जास्त वयाचे असेल तर आम्ही त्याला दोन्हींपैकी एक लस टोचतो व दुसरे व्हॅक्सिन घेण्यासाठी पुढील आठवड्यात येण्यास सांगतो हे बरोबर आहे का ?**

आदर्श पध्दत म्हणजे प्रत्येक लसीकरण सत्रात सर्व लसी उपलब्ध करून देणे होय. त्याच सत्रात त्याच दिवशी क्षय-रोगप्रतिबंधक / गोवर लसी देणे योग्य आहे. जर एक ते दोन आठवड्याच्या अंतराने ह्या लसी देऊ लागलात, तर दुसऱ्या लसीला प्रतिसाद एकाच वेळी देण्यात येणाऱ्या सर्व

लसींपेक्षा कमी मिळेल अशी शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्व लसी एकाच वेळी द्याव्यात किंवा चार आठवड्यांच्या अंतराने लसीकरण सत्रे आयोजित करावीत.

**47 : प्रश्न** **मातेच्या ॲन्टिबॉडीजचा लसीच्या परिणामकारकतेवर परिणाम होत असल्याने सर्वसाधारणपणे सर्व लसी बाळाच्या जन्मानंतर 6 आठवड्यांनी देण्याची प्रथा आहे. मग क्षय-रोगप्रतिबंधक लस जन्मानंतर लवकरात लवकर द्यायची शिफारस का केलेली आहे ?**

बी. सी. जी. मुळे येणारी क्षय-रोगप्रतिबंधक शक्ती 'सेल्युलर टाईपची' असते. त्या उलट इतर लसींची प्रतिकार शक्ती 'ह्यूमोरल टाईपची' असते; त्यामुळे मातेच्या ॲन्टिबॉडीज नवजात अर्भकाला दिल्या जात नाहीत. शिवाय असेही सिध्द झाले आहे की, बी. सी. जी लसीला जन्मत: तान्ह्या बाळाचा प्रतिसाद नंतर दिल्या जाणाऱ्या बी. सी. जी. लसी इतकाच असतो. म्हणून बी. सी. जी. लस जन्मानंतर लवकरात लवकर देण्याची शिफारस केली जाते व तिचा त्यामुळे सर्वांत जास्त उपयोग होतो.

**48 : प्रश्न** **काही डॉक्टर नवजात अर्भकासाठी क्षय-रोगप्रतिबंधक लसीचा 0.05 मिलि डोसची शिफारस करतात; परंतु आपल्या राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकामध्ये 0.1 मिलि डोसची शिफारस केली आहे. आम्ही कोणता डोस द्यावा ?**

राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकात दिल्याप्रमाणे कृपया आपण डोस द्यावा हे उत्तम.

**49 : प्रश्न** **आमच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील डीप फ्रीझरचा लाल दिवा कधी कधी लागतो. हे काही धोका सुचविते का ?**

नाही. जर डीप फ्रीझरमधील तपमान 15 अंश सें. किंवा त्यापेक्षा खाली जाते तेंव्हा त्याचा लाल दिवा लागतो. केवळ लाल दिवा लागलेला असेल तेव्हाच ते युनिट डीप फ्रीझर म्हणून कार्यरत आहे असे समजावे. लाल दिवा न लागण्याची खालील कारणेही असू शकतात.
1) अधूनमधून वीज जाणे, 2) वारंवार आइस पॅक्स गोठवण्यासाठी बदलणे, 3) फ्रीजरचे झाकण वारंवार उघडणे. इत्यादी कारणांनी डीप फ्रीजरमधील तपमान 15 अंश सें. पेक्षा जास्त आहे असे सूचित केले जाते. तथापि हिरवा दिवा लागलेला असणे ते युनिट कार्यरत असल्याचे निदर्शक आहे.

**50 : प्रश्न** **नवजात अर्भकाला लस टोचल्या जागी गळू अथवा एन्लार्जड ऑक्झिलरी लिम्फ नोड होण्याचा संभव विचारात घेता एक वर्षाच्या आतील बाळाला बी. सी. जी. चा नेमका किती डोस द्यावा ?**

पाश्चात्य देशातील अहवाल असे दर्शवितात की, 0.1 मिलि बी. सी. जी. लसीचा डोस सर्व वयोगटातील बालकाला द्यावा व एक वर्षाच्या आतील बालकाला त्याच्या निम्मा द्यावा. सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमाखाली गेल्या पाच वर्षात 0.1 मिलि डोस दिला जात आहे. त्यातून कोणतीही विपरित प्रतिक्रिया उद्भवत नाही असे आढळते. एक वर्षावरील बाळाला बी. सी. जी. लस देण्याची तरतूद नाही. अपवादात्मक स्थितीत मागणी केल्यास 4 वर्षांपर्यंत द्यावी. तथापि 4 वर्षांनंतर कदापि देऊ नये. सर्व बाबतीत 0.1 मिलि चा डोस द्यावा.

**51 : प्रश्न** **एम. एम. आर. (मंपस, मीझल्स व रुबेला) लसीचा अंतर्भाव सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमात का केला नाही ?**

देशातील साथीच्या रोगाचा स्थानिक दृष्ट्या विचार करून सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमाचे लसीकरण वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रक हळूहळू वाढवत नेलेले आहे. सध्या मंपस व रुबेला या रोगांचा देशात सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न या स्वरूपात प्रसार नाही. म्हणूनच त्यांचा अंतर्भाव सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमात केला नाही.

**52 : प्रश्न** **गोवराची लस राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकात दिलेल्या (म्हणजेच 9 ते 12 महिने वयोगट) या वटोगटा व्यतिरिक्त मुलांना देता येईल काय ? तसे असेल तर कमाल वयोमर्यादा काय ? गोवर साथीच्या काळात त्या भागातील 9 महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलांना गोवर लस देता येईल काय ?**

राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकानुसार 9 ते 12 महिने वयोगटातील मुलांना गोवर लस देण्याची शिफारस केलेली आहे. 9 महिन्यांनंतर दिलेल्या गोवराच्या लसीचा त्या बाळाला सर्वांत जास्त (80-82) फायदा होतो. या वयापर्यंत 10% मुलांना गोवर लागण झाली असती. तथापि सर्वसाधारणपणे 7% मुलांमध्ये मातेकडून आलेल्या अॅन्टिबॉडीज लसीची परिणामकारकता रोखतात.

शास्त्रीय दृष्ट्या सांगावयाचे झाल्यास, गोवराची लागण होऊन गेली नसल्यास कोणत्याही वयात ही लस देता येते. तथापि आपण राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रक अवलंबावे हे उत्तम.
गोवराची प्राथमिक लागण झाल्यापासून 72 तासाच्या आत जर लस दिली गेली तर ती रोगाची दुसरी अवस्था टाळण्यासाठी परिणामकारक ठरते.
गोवर साथीच्या काळात त्या भागात लागण झालेल्या किमान व कमाल वयोमर्यादा लक्षात घेऊन त्या वयोगटातील बाधा न झालेल्या मुलांना गोवर लस देण्यास हरकत नाही.

**53 : प्रश्न** **गर्भावस्थेच्या 16 ते 20 आठवडे या काळात दिलेल्या टी. टी. लसीचा उपयोग जेवढा होतो तेवढाच उपयोग गर्भावस्थेच्या 16 आठवडे पूर्व काळात दिली तर होतो काय ?**

होय. जेवढी लवकर टी. टी. लस द्याल तेवढे चांगले. जरी तिने गर्भपात करून घेतला तरी या लवकरात लवकर टी. टी. लस देण्याचा तिला जादा फायदा होतो.

**54 : प्रश्न** **सर्वसाधारणपणे सजीव लसीचे प्रत्येकी एक-एक डोस दिले जातात. कारण त्यांची शरीरात योग्य त्या प्रमाणात नैसर्गिकरीत्या वाढ होते व पुरेशी प्रतिकार शक्ती निर्माण होते; तर मग सजीव लस असूनही पोलिओ लसीचे किमान तीन डोस का दिले जातात ?**

तोंडाद्वारे देण्यात येणाऱ्या पोलिओ लसीमध्ये निरनिराळे तीन अँटीजेनिक सेरोटाइप्स असतात. यामागे अशी धारणा आहे की, प्रत्येक डोस दिल्यावर या तीनपैकी कोणता तरी एक सेसेटाइप आतड्यात तग धरून राहतो व त्याची वाढ होते. त्यामुळे इतर दोन सेरोटाइपांची मूळ धरणे व वाढ होत नाही. ती क्रिया पुढील दोन डोस दिल्यावरच होते. म्हणून पॉलिव्हॅलन्ट ओपीव्हीचे तीन डोस अत्यावश्यक आहेत.

**55 : प्रश्न** **अमेरिकेत ओपीव्ही लसीच्या दोन डोसमध्ये किमान अंतर आठ आठवडे आहे. मग आपल्या राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकात किमान चार आठवड्यांचेच अंतर का विहित केले आहे ?**

अ) बहुतांश बालकांमध्ये 4 आठवड्यात व्हॅक्सीन व्हायरस दिसेनासे होतात; म्हणून किमान अंतर 4 आठवडे ठेवलेले आहे.
ब) प्रशासकीय दृष्टया सुद्धा 4 आठवड्यांचा कालावधी सोईस्कर आहे.
क) दोन डोस देण्यातील अंतराच्या कालावधी जितका वाढेल तितके गळतीचे प्रमाण वाढेल.
ड) जास्त अंतर, वेळापत्रक पूर्ण करण्यास विलंब लावेल. अपुऱ्या संरक्षणामुळे जास्त बालके या रोगांना बळी पडण्याचा संभव वाढतो.
बालमृत्यूचे प्रमाण कमी करता यावे व बालकांना लवकरात लवकर पूर्ण संरक्षण मिळावे म्हणून राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकात दोन डोसमधील अंतर किमान 4 आठवड्यांचे ठेवले आहे.

**56 : प्रश्न** **गर्भावस्थेत स्त्रियांची काळजी, बाळंतपणातील काळजी, तसेच नवजात अर्भकांची निगा या बाबीवर गेल्या 40 वर्षात म्हणावे तितके लक्ष दिले गेले नाही. याबाबत पुढील योजना काय आहेत ?**

मातामृत्यूंचे प्रमाण घटविण्यासाठी सुरक्षित मातृत्वाच्या व प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या कार्यक्रमांचे महत्त्व आम्हास पटलेले आहे. म्हणून आठव्या पंचवार्षिक योजनेत एकात्मिक बाल रक्षक आणि सुरक्षित मातृत्व प्रकल्प राबविण्याचे योजिले आहे.

**57 : प्रश्न** **केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सार्वत्रिक बाल लसीकरणाला अधिक महत्त्व दिले होते. मग इ. स. 2000 सालापर्यंत बालमृत्यूचे प्रमाण पुरेसे कमी करण्याचे ध्येय गाठण्यासाठी सार्वत्रिक बाल लसीकरणाची ही पातळी टिकविणे पुरेसे ठरेल काय ?**

अंमलबजावणीतील सुलभतेच्या दृष्टीने बाल लसीकरणावर बराच भर देण्यात आला होता. तथापि 1984-85 साली जेव्हा सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम तयार करण्यात आला होता, तेव्हा बाल संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने इतर अंगांचाही तितक्याच हिरीरीने पुरस्कार करण्यात आला होता याचे अवधान ठेवणे आवश्यक आहे. उदा. अतिसारामुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी क्षार संजीवनी, तीव्र श्वसनदाह नियंत्रण, कुपोषणामुळे येणाऱ्या अशक्तपणास प्रतिबंध आणि 'अ' जीवनसत्त्वाची कमतरता दूर करणे. वरील उपायांशिवाय नवजात अर्भक संगोपन यांचाही विचार केल्यास उद्दिष्टे गाठता येतील.

**58 : प्रश्न एखाद्या वर्षी जर लसीकरणाची पातळी पात्र लाभार्थींच्या 85% किंवा त्याहून अधिक असेल तर हर्ड इम्युनिटी झाली असे समजावे का ? व त्यामुळे रोगांच्या लागणीच्या प्रमाणात घट होईल का ?**

हर्ड इम्युनिटी काही वर्षांनंतर येते (एका वर्षात नाही). दरवर्षी 10-15 टक्के असंरक्षित मुले तीन-चार वर्षे साचत गेली (आणि जर ती ठराविक भागातील असतील) तर रोगास बळी पडणाऱ्या मुलांचा समूह तयार होईल व एखाद्या वेळी रोगाच्या साथीचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**59 : प्रश्न गरोदर स्त्रियांना लसीकरण सत्रामध्ये लस देण्याची पध्दती अलिकडे अवलंबल्याने गेल्या दोन-तीन वर्षांत स्त्रियांना धनुर्वात प्रतिबंधक लस देण्याची पातळी कमी कमी होत आहे. तत्पूर्वी आमचा आरोग्य कार्यकर्ता घरोघरी जाऊन लस टोचीत असे. आता आम्ही नक्की काय करावे ?**

घरोघरी जाऊन लस दिली तर लसीची शीत साखळी खंडित होण्याची व लसीची व सेवांची गुणवत्ता ढासळण्याची शक्यता आहे. तथापि, लसीकरणाची पातळी कमी होण्याने निरुत्साही होण्याचे कारण नाही. लसीकरण सत्रामध्ये दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता टिकवण्यासाठी पर्यवेक्षण अत्यावश्यक आहे. त्यामुळे रोगांची लागण कमी करण्यास मदत होईल व सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमाचे अंतिम ध्येय हेच आहे.

**60 : प्रश्न** **साथ सुरू होण्याच्या पूर्व कालीन महिन्यात पल्स इम्युनायझेशन (मॉप अप राऊंडस) का सुचविले आहेत ?**

तोंडाद्वारे द्यावयाची पोलिओ लस साथ नसल्या काळात उत्तम परिणामकारक आहे (हायेस्ट सेरो कन्व्हर्शन). सर्वसाधारणपणे पोलिओ साथ उन्हाळा आणि पावसाळ्यात (जुलै - सप्टेंबर) उद्भवते. म्हणून मॉप अप राऊंडस म्हणजेच एक महिन्याच्या अंतराने पोलिओ लसीचे दोन डोस साथ पूर्व काळात देण्याची शिफारस केली आहे. तथापि, मागील वर्षातील अनुभव लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्याने साथ पूर्व काळ ठरवावा.

**61 : प्रश्न** **गेल्या पाच वर्षात लसीकरणाच्या वाढलेल्या पातळीमुळे रोगांच्या प्रमाणात घट झाली आहे काय ?**

उपलब्ध आकडेवारीनुसार गोवर रोग सोडून इतर लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या पाच रोगांच्या लागणीच्या प्रमाणात घट झाल्याचे निश्चितपणे दिसून येते. गोवर लसीकरण 1989-90 पासून सार्वत्रिक करण्यात आले आहे. त्यामुळे त्याचा प्रभाव अद्याप ठळकपणे दिसून येत नाही.

**62 : प्रश्न** **असे सांगण्यात येते की, सुरक्षित मातृत्व या कार्यक्रमाखाली प्रशिक्षित दाईंचा प्रभाव अगदीच नगण्य (7 ते 10%) आहे. याचा अर्थ प्रशिक्षित दाईंचा कार्यक्रम बंद करण्यात येईल काय ?**

नाही. प्रशिक्षित दाई कार्यक्रमाचा सुरक्षित मातृत्व, प्रसूतिपूर्व सेवा, पाळणा लांबविणे व नजिकच्या दवाखाना अथवा रुग्णालयात शिफारस करून पाठविणे यापेक्षा कमी प्रमाणात प्रभाव आहे. प्रत्येक गावात / नागरी झोपडपट्टी क्षेत्रात किमान एकतरी प्रशिक्षित दाईची सुविधा उपलब्ध करून दिल्याशिवाय प्रशिक्षित दाईमार्फत 100% बाळंतपणे हे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठता येणार नाही. 'बालकांचे जीवित्व व सुरक्षित मातृत्व' या प्रकल्पात दाईचे प्रशिक्षण व इतर सेवा या संरक्षित मातृत्वाचा एक भाग आहे.

**63 : प्रश्न कलकत्त्याच्या संसर्गजन्य रोगांच्या रुग्णालयात दाखल करून घेतलेल्या घटसर्पाच्या सुमारे 1000 रुग्णांपैकी जवळ जवळ 134 रुग्णांना त्रिगुणीची लस देण्यात आली होती. हे त्रिगुणी लसीच्या अपयशाचे द्योतक मानायचे काय ?**

जो पर्यंत त्रिगुणी लस टोचणीचा पूर्व इतिहास हा केवळ तोंडी सांगण्यावर अवलंबून आहे, तोपर्यंत तो निर्णायक पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही. एखाद्या मुलाचे लसीकरण झाले आहे हे समजण्यासाठी त्याच्या योग्य वयात (16 ते 24 महिने आणि 5 ते 6 वर्षे) पूरक मात्रा दिल्याचाही विचार करावा लागेल. लसीची शीतसाखळी अखंड राखणे यालाही बरेच महत्त्व आहे. आपण सांगितलेल्या रुग्णांचे सविस्तर अन्वेषण केल्याशिवाय त्याचे नक्की कारण लसींचे अपयश असे मानता येणार नाही.

**64 : प्रश्न बालकांचे जीवित्व व सुरक्षित मातृत्व या प्रकल्पामुळे सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाखालील मासिक प्रगती अहवालाच्या नमुन्यात कोणते बदल अपेक्षित आहेत ?**

प्रत्येक राज्यात त्यांची स्वतःची एम. आय. एस. पध्दती आहे. तथापि, सध्याच्या अहवालाच्या नमुन्यात योग्य ते बदल करून एकात्मिक बालक जीवित्व व सुरक्षित मातृत्व या खालील महत्त्वाच्या काही बाबींचा अंतर्भाव होईल. उदा. सी. डी. डी., ए. आर. आय., 'अ' जीवनसत्त्व आणि आय. एफ. ए.

**65 : प्रश्न केवळ हिन्दी भाषिक राज्यांमध्ये सुरक्षित मातृत्व प्रकल्पाची सुरवात केली जाणार आहे असे समजते. कृपया असे का ? हे स्पष्ट करावे.**

मुळातच असे काहीही नाही. 1995 पर्यंत हा प्रकल्प संपूर्ण देशात टप्प्या-टप्प्याने अंमलात येणार आहे. हिन्दी भाषिक राज्यांना सेवा देय पध्दतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी अधिक प्रयत्न करावा लागणार आहे. त्याच प्रमाणे उपचारांच्या सोईत वाढ करावी लागेल. खास कुशलता, प्रशिक्षण, संपर्क साहित्य व इतर सामग्री इ. उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रे पातळीपर्यंत सर्व जिल्ह्यांना दिली जातील.

**66 : प्रश्न** **या देशातील तीन वर्षे वयोगटातील बालकांनाच बहुत: तीव्र पोलिओची बाधा होते. मग 16-24 महिने वयोगटातील पोलिओ पूरक डोसला म्हणावे तेवढे महत्त्व का दिले जात नाही ?**

वयाच्या 16 ते 24 महिने या काळात बालकांना देण्यात येणाऱ्या पूरक पोलिओ डोसवर आपण भर देत आहात हे अगदी बरोबर आहे. हे मंत्रालय सर्व राज्यांना गेल्या वर्षी ज्यांचे तीनही प्राथमिक डोस पूर्ण झालेले आहेत अशा बालकांचे पूरक डोससाठी या वर्षात उद्दिष्ट निश्चित करून द्यावे अशी विनंती करीत आहे.

**67 : प्रश्न** **वर्तमानपत्रातून आलेल्या माहितीवरून असे दिसते की, मध्य प्रदेशातील मोरेना जिल्ह्यात 74 नवजात अर्भक धनुर्वाताचे मृत्यू झाले याचा अर्थ गरोदरपणात दिलेली धनुर्वात प्रतिबंधक इंजेक्शने परिणामकारक नसतात काय ?**

नवजात अर्भक धनुर्वात यांचा संबंध दोन प्रमुख बाबींशी असतो.
अ) धनुर्वात प्रतिबंधक लसीकरणाची पातळी, ब) स्वच्छ बाळंतपणाचे आचरण. या दोन्ही बाबींचे एकत्रित / संयुक्त परिणाम विचारात घेतल्याशिवाय नवजात अर्भक धनुर्वात याचे समूळ उच्चाटन होणार नाही. मोरेना जिल्ह्यात धनुर्वात प्रतिबंधक लसीकरणाची पातळी कमी आहे. शिवाय तेथील बाळंतपणाचे संस्कार स्वच्छ व बाळंतपणास पोषक नाहीत. उदा. मुलतान मातीचा वापर, नाळ कापल्यावर त्याला तेल लावणे इत्यादी. सध्या तरी धनुर्वात प्रतिबंधक लसीकरण प्रभावी व परिणामकारक आहे.

**68 : प्रश्न** **आदिवासी दुर्गम भागात, तसेच मागासवर्गीयांची मुले लसीकरणासाठी सत्रांच्या ठिकाणी आणली जात नाहीत. तेव्हा आपल्या आरोग्य सेवकांनी लसीकरण संख्या वाढविण्यासाठी घरभेटी देऊन लसीकरण करावे काय ?**

कदापि नाही. लसीकरण संख्या वाढविण्याच्या प्रयत्नात गुणवत्तेशी तडजोड चालणार नाही. गुणवत्तेची प्रथम खात्री करून घेणे निकडीचे आहे.

**69 : प्रश्न 70 ते 90 टक्के लसीकरण पातळी असलेल्या जिल्ह्यात पोलिओ रोगाचा उद्रेक होऊ शकतो काय ?**

होय. जिल्ह्याची लसीकरण पातळी उच्च असूनही त्या जिल्ह्यातील लसीकरण पातळी कमी असलेल्या भागात तीव्र स्वरूपात साथ पसरल्याची उदाहरणे आढळली आहेत. जिल्ह्यातील विविध भागातील लसीकरण पातळी भिन्न असते. म्हणून अशी लसीकरण पातळी कमी असलेली क्षेत्रे व अति जोखमीची क्षेत्रे हुडकून काढून तेथील लसीकरण वाढविणे व जिल्ह्याच्या पातळीच्यावर नेणे आवश्यक आहे. म्हणजे साथ उद्रेकास निश्चितपणे प्रतिबंध बसेल.

**70 : प्रश्न आपल्या देशात लसीकरणाद्वारे रोगांचे प्रतिबंधन करता येणाऱ्या विविध लसींपैकी बालमृत्यूंच्या प्रमाणात घट आणण्यात कोणत्या लसींचा जास्तीत जास्त उपयोग होतो ?**

गरोदरपणी स्त्रियांना देण्यात येणारी धनुर्वात प्रतिबंधक लस (टी. टी.) व बालकांना देण्यात येणारी गोवर प्रतिबंधक लस यांचा नवजात अर्भकांचे धनुर्वातापासून रक्षण करून व गोवर व त्यातून उदभवणाऱ्या नंतरच्या गुंतागुंतीपासून संरक्षण होण्याने बालमृत्यूच्या प्रमाणात खूप घट आणता येते.



बाळाला छान छान तीट लावू ....

रोगप्रतिबंधक लसी त्याला टोचुनी घेऊ !